# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १२/०३/२०२४ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५८१** **विषय क्रमांक- ५८१**
**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८१ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्रमांक - अक्षेका/वि/चि-२/कावि/३०१/२०२४ दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये, अ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० राजर्षी शाहु महाराज पुतळया मागे शाहु सृष्टीसाठी कामे करणेस वाढीव खर्चासह सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत. |
| **ठराव क्र. ५८१ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्रमांक - अक्षेका/वि/चि-२/कावि/३०१/२०२४ दिनांक ०६/०३/२०२४ अन्वये, अ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० राजर्षी शाहु महाराज पुतळया मागे शाहु सृष्टीसाठी कामे करणेस वाढीव खर्चासह सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबतच्या सन २०२१-२२ मध्ये उद्यान स्थापत्य विभागा मार्फत कळविल्या नुसार र.रू. ५९,१०,४७६/- इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार केलेले होते.<br>त्यानुसार र.रू. ६६,१९,७३३/- इतकी तांत्रिक मान्यता मिळालेली होती तथापी उपलब्ध तरतूदीच्या दीडपट मर्यादेत अंदाजपत्रक तयार करून रक्कम २९,१०,८९६/- इतकी निविदा काढणेत आलेली आहे. सदर कामांतर्गत पुतळयाचे समोरील बाजूचे सुशोभीकरण करणे व मागील बाजूस शाहु सृष्टी उभारणेचे नियोजन उद्यान स्थापत्य विभागामार्फत करणेत आलेले आहे. त्या करीता स्थापत्य विभागामार्फत मे. सृजन आर्किटेक्ट यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. सदर आर्कीटेक्ट यांनी केलेल्या डिझाइन व ड्राईंग नुसार विद्युत विषयक कामाचे अंदाजपत्रक करण्यात आलेले आहे. तथापी सद्य परिस्थीतीत उपरोक्त नमुद निविदा नुसार काढलेल्या कामाची खर्च मर्यादा संपलेली असुन अद्याप सदर पुतळयाच्या समोरील बाजूचे सुशोभीकरणांतर्गत करावयाचे डेकोरेटीव्ह पोल व दिवे बसविणे बाकी आहे.<br>तसेच पुतळयाचे मागील बाजूस करणेत येत असलेल्या शाहुसृष्टी चे उर्वरीत काम करणे बाकी आहे. मा. अतिरिक्त आयुक्त यांनी प्रत्यक्ष भेटीच्या वेळेस सद्या तातडीने केवळ पुतळयाचे समोरील बाजुचे काम पुर्ण करणे करीता लागणाऱ्या वाढीव खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेच्या सुचना केलेनुसार अंदाजपत्रक तयार केले असुन र.रू.२५,४२,६५८/- इतका जादा खर्च अपेक्षीत आहे. प्रस्तूत काम हे २०.२९% कमी इतक्या दराने करणेत येत आहे. वाढीव खर्चाचे काम त्याच मंजूर दराने करणेस ठेकेदार मे. टेक्नोवा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हे तयार आहेत.सदर कामाकरीता सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकानुसार र.रू. ३,००,००,०००/-इतकी प्रशासकिय मान्यता मंजूर आहे. तसेच र.रू. ६६,१९,७३३/- इतकी तांत्रिक मान्यता मंजूर आहे. तथापी कांही बाबी नव्याने अंदाजपत्रकात समाविष्ट केल्यामुळे |

| | |
|---|---|
| | सदर वाढीव खर्चासहीत होणाऱ्या एकुण र.रू. ५४,५३,५५४/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असुन सदर वाढीव खर्चासहीत एकुण र.रू. ५४,५३,५५४/- चे खर्चास मा. महापालिका सभेची मान्यता घंणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**.प्रशासक ठराव क्रमांक- ५८२** **विषय क्रमांक- ५८२**

**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८२ दिनांक -** १२/०३/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्रमांक नगररचना/१०/८१/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील सुधारीत मंजुर विकास योजनेतील सि.स.नं.४८६५ (पै) संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आरक्षण क्र. ५७ HDH या प्रयोजनार्थ आरक्षित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५८२ दिनांक -** १२/०३/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्रमांक नगररचना/१०/८१/२०२४ अन्वये, मौजे पिंपरी येथील सि.स.नं.४८६५(पै) संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आरक्षण क्र.५७ HDH या प्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या ४० आर क्षेत्रापैकी म्हाडाच्या मालकीचे १,१९७ चौ.मी. प्रत्यक्ष क्षेत्र हे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनियम क्र.४.२७(३) मधील तरतुदीनुसार प्रस्तावित असलेल्या वाय. सी. एम. रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालय विस्तारीकरण, पॅरामेडिकल महाविद्यालय विद्यार्थी हॉस्टेलकरिता पिं. चिं म.न.पा.स हस्तांतरण करण्याची कार्यवाही करून म्हाडा ठराव क्र. ७०७२ दि.१४.०९.२०२३ मधील तरतुदीनुसार ही जागा प्रचलीत शीघ्रसिध्दगणक दराच्या १००% दराने अधिमुल्य रुपये १,८१,१०,६१०/- रक्कम पुणे मंडळास अदा करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५८३**

**विषय क्रमांक- ५८३**

**दिनांक – १२ /०३/२०२४**

**खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| क्र. ५८३<br>क - १२ /०३/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/१५७/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, 'कार्यकारी अ<br>(स्थापत्य)' पदावरील पदोन्नतीस मान्यता देणेबाबत. |
| क्र. ५८३<br>क -१२/०३/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/१५७/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, -: पिंपरी चिं<br>महानगरपालिका आस्थापनेवर **'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)** 'अभिनामाचे २४ पदे **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०**<br>मध्ये शासन मंजूर आहे. **कार्यकारी अभियंता (स्थापत्य)'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी माआयुक्तसो या<br>अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०१/०३/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार **'कार्यकारी अ**<br>**(स्थापत्य)'**पदोन्नतीच्या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शि<br>आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१<br>मार्गदर्शक तरतुदींनुसार तसेच स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता व पदोन्नती संदर्भात न्यायप्रविष्ठ असलेल्य<br>याचिकांमधील अंतिम निर्णयास अधिन राहूनखालील अधिकारी यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यास<br>न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णय तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने**'कार्यकारी अ**<br>**(स्थापत्य)'** अभिनामाचे रिक्त पदांवर **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी** ६७७००-२०८७०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्य<br>समितीने सर्वानुमते शिफारसकेली आहे. |

| अक्र. | दि.३१/१२/२००७ रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रम दिनांक २५/०५/२००४ रोजीची स्थिती गृहित धरुन विचारात घेतलेला क्रमांक | उपअभियंता पदावरील अधिका यांचे नावं- | पदवीपदवीका / बिंदू निहाय क्रम | पदोन्नतीचा प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९ | ननावरे वैशाली सुहास | पदवी | ज्येष्ठतेनुसार | |
| २. | २१ | मोराणकर राजेंद्र रामदास | पदवी | ज्येष्ठतेनुसार (दिव्यांग( | |
| ३. | २३ | वाईकर विजय किसन | पदवी | ज्येष्ठतेनुसार | |
| ४. | २७ | बन्सल हरविंदरसिंग प्रेमजितसिंग | पदवी | ज्येष्ठतेनुसार | |
| ५. | ३८ | सोनवणे विजय पुंडलिक | पदवी | ज्येष्ठतेनुसार | श्री.बोरावके यांना कार्यकारी अभियंता (स्था) पदावर पदोन्नत दिलेनंतर त्यांचे दि.३०/०४/२०२४ रो जी रिक्त होणा-या पदावर |
| ६. | २८ | भोसले विजयसिंह हेमराज | पदवी | ज्येष्ठतेनुसार | श्री.राजेंद्र राणे, सह शहर अभियंता यांचे |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सेवानिवृत्तीमुळे दिनांक<br>३१/०५/२०२४ रोजी<br>रिक्त होण्या-या पदावर<br>श्री.सुर्यवंशी अजय<br>दिनकर यांना पदोन्नती<br>दिलेनंतर रिक्त होण-या<br>पदावर |
| | | ७. | २९ | कोल्हे लक्ष्मीकांत पंढरीनाथ | पदवी | ज्येष्ठतेनुसार | श्री.टकले रामनाथ<br>निवृत्ती, कार्यकारी<br>अभियंता (स्था) यांचे<br>सेवानिवृत्तीमुळे<br>दि.३०/६/२०२४ रो<br>जी रिक्त होणा-या<br>पदावर |
| | | ८. | ३० | भोजने विजय ज्ञानदेव | पदवी | ज्येष्ठतेनुसार | श्री.देसले विलास<br>नामदेव, कार्यकारी<br>अभियंता (स्था) यांचे<br>सेवानिवृत्ती मुळे<br>दि.३१/७/२०२४ रोजी<br>रिक्त होणा-या पदावर |
| | | ९. | ३१ | नरोटे सुनिलदत्त लहानू | पदवी | ज्येष्ठतेनुसार | श्री.ढवळे आबासाहेब<br>कृष्णाजी, कार्यकारी<br>अभियंता (स्था) यांचे<br>सेवानिवृत्ती मुळे<br>दि.३१/०८/२०२४<br>रोजी रिक्त होणा-या<br>पदाव |
| | | १०. | ३२ | बरीदे महेश वसंत | पदवी | ज्येष्ठतेनुसार | श्री.जुंधारे ज्ञानदेव, सह<br>शहर अभियंता यांचे<br>सेवानिवृत्ती मुळे दिनां<br>३१/०८/२०२४ रोजी<br>रिक्त होणा-या पदावर<br>श्री.भागवानी सुनिल<br>ऐंशीराम यांना<br>पदोन्नती दिल्यानंतर<br>रिक्त होणा-या पदावर |
| | | ११. | १५ | वाघमारे सतिश बाबासाहेब | पदवीका | ज्येष्ठतेनुसार | |
| | | १२. | १६ | जाधव विजय काळुराम | पदवीका | ज्येष्ठतेनुसार | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | १८ | बोरावके देवेंद्र हनुमंतराव | पदवीका | ज्येष्ठतेनुसार | श्री.तुपसाखरे संजय अनंत यांचे सेवानिवृत्तीमुळे दि.३१/०३/२४रोजी रिक्त होणा-या पदावर |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित आहे. त्यानुसार प्रस्तुतचा विषय नजिकचे मा.महापालिका सभेसमोर सादर क येत असून त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५८४** **दिनांक – १२ /०३/२०२४**

**खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **य क्र. ५८४**<br>**क - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. साप्रवि/२/कावि/१५८/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, 'सह शहर अभि पदावरील पदोन्नतीस मान्यता देणेबाबत. |
| **व क्र. ५८४**<br>**क -१२/०३/२०२४** | पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'सह शहर अभियंता'** अभिनामाचे पद **पे.लेवल S- वेतनश्रेणी** ७८८००-२०९२०० मध्ये शासन मंजूर आहे.<br>**'सह शहर अभियंता'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो य अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०१/०३/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार **शहर अभियंता** पदोन्नतीच्या निकटतम निम्न पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालाव सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता सेवाविषयक तपशील पडताळून 'सह शहर अभियंता' या अभिनामाच्या पदोन्नतीच्या रिक्त जागेवर मह शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि ०७ मे, २०२१ मधील विनिर्दिष्टीत बाबी विचारात घेवून मागासवर्गी यांचे पदोन्नतीतील आरक्षण करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णय तसेच स्था अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता व पदोन्नती संदर्भात न्यायप्रविष्ट असलेल्या सर्व याचिकां मधील अं निर्णयास अधिन राहून खालील अधिका-यांना मा.महापालिका सभेच्या मान्यतेने **'सह शहर अभियं** अभिनामाच्या रिक्त पदांवर पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदो देण्याबाबत सदर समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे. |

| अ.क्र | कार्यकारी अभियंता (स्था) पदाची दिनांक ०१/०१/२०२२ रोजीचे अंतिम सेवाज्येष्ठता यादीतील क्रम | अधिकारी नावं व पदनाम | पदोन्नतीचा प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | १२ | सुर्यवंशी अजय दिनकर | ज्येष्ठते नुसार | श्री.राणे राजेंद्र वसंतराव, सह शहर अभियंता (स्था) यांचे दि.३१/०५/२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीमुळे रिक्त हेणा-या पदावर |
| २ | १३ | भागवानी सुनिल ऐंशीराम | ज्येष्ठते नुसार | श्री.जुंधारे ज्ञानदेव रामचंद्र, सह शहर अभियंता (स्था) यांचे दि.३१/०८/२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीमुळे रिक्त हेणा-या पदावर |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नुसार महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक अ या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा क असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहित आहे. त्यानुसार प्रस्तुतचा विषय नजि मा.महापालिका सभेसमोर सादर करण्यात येत असून त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रश यांची मंजूरी देणेत येत आहे.

**.प्रशासक ठराव क्रमांक- ५८५** **विषय क्रमांक- ५८५**
**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८५ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. वैद्य/०३/कावि/ १०९/२०२४ दि. ११/०३/२०२४ अन्वये, भारत विकास शिक्षण संस्थेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका रुग्णालयांची संलग्नतेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५८५ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. वैद्य/०३/कावि/ १०९/२०२४ दि.११/०३/२०२४ अन्वये, मे. भारत विकास शिक्षण संस्था यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत असलेल्या रुग्णांलयांशी भारत विकास संस्थेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका रुग्णालयांशी संलग्नीकरण मिळणेबाबत विनंती केली आहे. मा. अवर सचिव यांचेकडील १९ मे २०१६ चे मार्गदर्शनपर पत्रानुसार सदर अभ्यासक्रमासाठी महापालिकेने त्यांच्या रुग्णालयाचे संलग्नीकरण देण्याकरीता Medical Council Of India यांच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नाही व आयुर्वेदीक डॉक्टरांना Allopathy ची प्रॅक्टीस करण्यासाठी राज्य शासनाने मान्यता प्रदान केलीली आहे असे कळविले आहे. सदरचे कोर्सेस BAMS झालेल्या डॉक्टरांसाठी Post Graduate Certificate Courses असल्याने महानगरपालिकेस विना वेतनी पूर्णवेळ BAMS डॉक्टर उपलब्ध होतील. त्यामुळे भारत विकास शिक्षण संस्थेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका रुग्णालयांची संलग्नता देणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. परंतु सदरचे कोर्सेस महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये नव्याने सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याने सदरची बाब हि धोरणात्मक आहे व यास मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक असलेने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची |

| | |
|---|---|
| | मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५८६** **विषय क्रमांक- ५८६**
**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८६ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. वैद्य/१४अ/कावि/२२३/२०२४ दि.११/३/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी वैद्यकीय विमा लागू करणेत आलेने र.रु.20 लाखाचे वरील वैद्यकीय उपचार व शासनमान्य ५ गंभीर आजारांसाठी र.रु.5 हजाराचे वरील OPD स्वरूपातील औषधोपचार खर्चास तसेच वैद्यकीय खर्चाकामी स्वतंत्र मनपा फंड तयार करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५८६ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. वैद्य/१४अ/कावि/२२३/२०२४ दि.११/३/२०२४ अन्वये, 1. मा.आयुक्त सो आदेश क्र.वैद्य/14अ/कावि/205/2024 दि.04/03/2024 नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी वैद्यकीय विमा लागू करणेकामी आदेश निर्गत करणेत आला आहे. 2. मा.आयुक्त सो आदेश क्र.वैद्य/14अ/कावि/206/2024 दि.04/03/2024 व आदेश क्र.वैद्य/14अ/कावि/215/2024 दि.04/03/2024 नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी वैद्यकीय विमा लागू करणेकामी आरोग्य विमा हप्ता अदा करणेकामी आदेश निर्गत करणेत आला आहे. व त्यानुसार संपुर्ण एकुण विमा हप्ता र.रु.27,84,78,608/- इतकी रक्कम अदा करणेत आलेली आहे. 3. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे धन्वंतरी स्वास्थ्य योजना ऐवजी विमा चालू करणेचे अनुषंगाने दि.06/07/2023 रोजी अतिरिक्त आयुक्त-2 यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणेत आली होती. त्याचा सविस्तर सभावृत्तांत करणेत आला असून त्यास मा.आयुक्त सो यांनी दि.18/07/2023 चे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. सदर बैठकीत खालील प्रमाणे विषय मंजूर करणेत आले आहेत -<br>a) एखाद्या कुटुंबास आवश्यकता भासल्यास र.रु.20 लाखांचे वरील बील अदायगी र.रु.5 कोटी Buffer Limit मधून अदायगी करण्याची मागणी विमा कंपनीने अमान्य केल्यास सदर 20 लाखांवरील बिलांची रक्कम धन्वंतरी स्वास्थ्य समितीची मान्यता घेवून मा.आयुक्त यांचे मान्यतेने मनपा फंडातून रुग्णालयांस अदा करावी.<br>b) र.रु.5 कोटी Buffer Limit संपलेस आवश्यकता भासल्यास मनपा फंडातून खर्च करणेकामी मा.आयुक्त यांची मान्यता घेणेत यावी. |

| | |
|---|---|
| | c) शासन मान्य ५ गंभीर आजारांवरील औषधोपचार (Out patient Benefit) कामी विमा कंपनी सोबत झालेल्या करारनाम्यामधील अट क्र.8.32 मध्ये र.रु.5000/- प्रति कुटूंब प्रति वर्ष इतकी खर्च मर्यादा असून र.रु.5000/- पेक्षा जास्त रकमेची आवश्यकता भासलेस र.रु.1 कोटी चे Buffer Limit मर्यादेमधून मा.आयुक्त यांचे मान्यतेने देता येईल असे नमुद केले आहे. र.रु.1 कोटी Buffer Limit संपलेस आवश्यकता भासल्यास मनपा फंडातून खर्च करणेकामी मा.आयुक्त यांची मान्यता घेणेत यावी.<br>वरील सर्व बाबीस मा.आयुक्तसो यांच्या दिनांक १८/०७/२०२३ रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे.<br>4. दि.10/10/2023 चे धन्वंतरी स्वास्थ्य समितीचे बैठकीनुसार विमा कंपनीने १ वर्ष कालावधीसाठी विमा कार्यान्वित करावा व तद्नंतर बिलांची संख्या व रक्कम यांची वस्तुस्थिती पाहून पुढील वर्षाकरीता मुदतवाढीबाबत अलहिदा निर्णय घेणेत येईल. असा निर्णय घेणेत आलेला आहे त्यानुसार उक्त क्र.१ नुसार आदेश निर्गत करणेत आलेला आहे.<br>5. उक्त सर्व बाबींचे अवलोकन करता र.रु.20 लाखाचे वरील वैद्यकीय खर्च, र.रु.5 कोटी Buffer Limit संपुष्टात आलेनंतर तसेच शासन मान्य 5 गंभीर आजारांवरील OPD स्वरुपातील औषधोपचार र.रु.5,000/- चे वरील व र.रु.1 कोटी Buffer Limit संपलेस आवश्यकता भासल्यास मनपा फंडातून मा.आयुक्त यांनी दि. १८/०७/२०२३ च्या प्रस्तावान्वये मान्यता दिली आहे. सदर खर्च करणे कामी स्वतंत्र मनपा फंड तयार करणे आवश्यक आहे, उक्त सर्व बाबींचे अवलोकन करता र.रु.20 लाखाचे वरील वैद्यकीय खर्च, र.रु.5 कोटी Buffer Limit संपुष्टात आलेनंतर तसेच शासन मान्य 5 गंभीर आजारांवरील OPD स्वरुपातील औषधोपचार र.रु.5,000/- चे वरील व र.रु.1 कोटी Buffer Limit संपलेस आवश्यकता भासल्यास मनपा फंडातून खर्च करण्यास मा.आयुक्त यांनी दि. १८/०७/२०२३ च्या प्रस्तावान्वये मान्यता दिली आहे. सदर खर्च करणे कामी स्वतंत्र मनपा फंड तयार करणे आवश्यक आहे, तसेच सदर बाब नव्याने सुरु करण्यात येत असल्याने धोरणात्मक निर्णयास मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५८७** **विषय क्रमांक- ५८७**

**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८७ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सा.प्र.वि/७/कावि/१७४/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, सह.शहर अभियंता (स्थापत्य) या पदाचे सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करणे मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५८७** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सा.प्र.वि/७/कावि/१७४/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : |

<table>
<tr>
<td>दिनांक - १२/०३/२०२४</td>
<td>
पीसीसी-३०१५/प्र.क्र.५४५/नवि-२२ दिनांक ३० ऑगस्ट, २०१९ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विभागांकरिता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार स्थापत्य विभागाकरिता सह शहर अभियंता गट-अ या अभिनामाच्या ५ पदास शासन मंजूरी देण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या सन २०११ चे जनगणनेनुसार सुमारे १७ लाख एवढी आहे, त्याप्रमाणे मागील काही वर्षांमध्ये शहराच्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असून वाढते नागरीकारण व त्याअनुषंगाने महानगरपालिकेवर सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत पडणारा बोजा व ताण दिवसेंदिवस सतत वाढत आहे. शहरातील नागरीकांना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा गट – ब वर्गामध्ये समावेश करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे भविष्यकाळात नवीन गावांचा महापालिका हद्दीमध्ये समावेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ व ५३ मधील तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या अधिका-यांच्या पदांसाठींची कलम ४५(३) व ४५७(३) अन्वये सह शहर अभियंता (स्थापत्य) पदाची नेमणुकी करीता शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पद्धत शासन मंजूरीकामी सादर करतेवेळी खालील प्रमाणे होती.
<table>
<tr><th>पदनाम</th><th>नेमणूकीची पद्धत व टक्केवारी</th><th>नेमणुकी करिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती</th></tr>
<tr><td>सह शहर अभियंता</td><td>पदोन्नतीने<br>(४ पदांकरिता)</td><td>१. मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील स्थापत्य अभियंत्रिकी विषयाची पदवी (B.E.Civil)<br><br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता/उप शहर अभियंता/सहा. संचालक नगररचना/कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन) पदावरील कामकाजाचा सलग ३ वर्ष अनुभव आवश्यक.</td></tr>
<tr><td></td><td>पदोन्नतीने<br>(१ पदांकरिता)</td><td>१. मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/पदविका (बी.ई./डी.सी.ई.)<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता/उप शहर</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | अभियंता/सहा. संचालक नगररचना पदावरील कामकाजाचा पदवीधारक सलग ३ वर्ष आणि पदविकाधारक असल्यास ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार सह शहर अभियंता (स्थापत्य) पदावर नियुक्तीकरिता खालील प्रमाणे निकष ठरविण्यात आलेले आहेत.

**पदोन्नती १००%**

१. मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील स्थापत्य अभियंत्रिकी शाखेची पदवी (B.E.Civil) अगर तत्सम पदवी आवश्यक.
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता/उप शहर अभियंता/कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन) पदावरील कामकाजाचा सलग ३ वर्ष अनुभव आवश्यक.

उदघृत बाबींचा विचार करता महापालिकेच्या पाच वर्षांच्या भूमिकेचा अंदाज घेण्याचा आणि सेवा/केडरच्या बदलत्या गरजांशी त्याचा संबंध जोडण्याचा गंभीर प्रयत्न झाला पाहिजे. भविष्यातील पदोन्नतीमधील अडथळे टाळता येतील अशा प्रकारे पदोन्नती साखळीची योजनेची आवश्यकता, सेवेची परिणामकारकता वाढविणे तसेच कर्मचा-यांच्या पदोन्नतीतील अपेक्षांसह कार्यात्मक गरजा सुसंगत करण्यासाठी पदोन्नती साखळीची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. सबब, सह शहर अभियंता (स्थापत्य) या पदाची खालील प्रमाणे सेवाप्रवेश नियम मंजूरीकामी प्रस्तुतचा विषय नजिकचे मा.महापालिका सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

| पदनाम | नेमणूकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकी करिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| सह शहर अभियंता (स्थापत्य) | पदोन्नतीने (४ पदांकरिता) | १. मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील स्थापत्य अभियंत्रिकी विषयाची पदवी (B.E.Civil)<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता/उप शहर अभियंता/सहा. संचालक नगररचना/कार्यकारी अभियंता (वाहतुक नियोजन) पदावरील कामकाजाचा सलग ३ वर्ष अनुभव आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| | | |
| | पदोन्नतीने<br>(१ पदांकरिता) | १. मान्यताप्राप्त विद्यापिठाकडील स्थापत्य अभियंत्रिकी शाखेची पदवी/पदविका (बी.ई./डी.सी.ई.)<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता/उप शहर अभियंता/सहा. संचालक नगररचना पदावरील कामकाजाचा पदवीधारक सलग ३ वर्ष आणि पदविकाधार असल्यास ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| | |
|---|---|
| | वरील प्रमाणे विषयास मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**.प्रशासक ठराव क्रमांक- ५८८** **विषय क्रमांक- ५८८**

**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८८ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. झोनिपु/स्था/कावि/१५९/२०२४, दि.१२/०३/२०२४ अन्वये, झोनिपु स्थापत्य विभागाकडील कामकाजाकरिता करारपध्दतीने एकत्रित मानधनावर उपअभियंता यांची नेमणुक करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५८८ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र..झोनिपु/स्था/कावि/१५९/२०२४, दि. १२/०३/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती विषयक कामे व DPDC Cell कडील कामे तसेच महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आमदार व खासदार यांच्या विविध फंडामधून कामे करण्याचा अनुभव व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याशी समन्वय साधण्याचे कामकाज करणेकरिता करारपध्दतीने एकत्रित मानधनावर उपअभियंता यांची नेमणुक करणेबाबतची जाहिरात १/२०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली. सदर जाहिरातीस अनुसरून २ उमेदवाराचे अर्ज प्राप्त झाले त्यापैकी श्री. सुनिल जगन्नाथ हरिदास हे पात्र झाले त्यामुळे श्री. सुनिल जगन्नाथ हरिदास यांची “विवक्षित सेवा / कामासाठी सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने उपअभियंता नेमणुक करण्यास व शासन निर्णय संकिर्ण २७१५/प्रक्र १००/१३, दि.१७/१२/२०१६ व शासन निर्णय संकिर्ण २७१५/प्र |

| | |
|---|---|
| | क्र.१००(भाग-१)/२०१३ दि. ०८/०९/२०२३ मधील तरतुदीनुसार पारिश्रमिक झोनिपु स्थापत्य विभागामार्फत अदा करणेस व त्याप्रमाणे आदेश निर्गमित करणेसाठी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असलेने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५८९** **विषय क्रमांक- ५८९**

**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८९ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. स्था/९/कावि/६०३/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, "सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील विविध कामांसाठी एकत्रित प्रशासकीय मान्यता देणेबाबत". |
| **ठराव क्र. ५८९ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. स्था/९/कावि/६०३/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, मा.महापालिका (प्रशासक) सभा ठराव क्रमांक ५४८ दिनांक २०/०२/२०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारीत व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती ठराव क्र. ३०६१ दिनांक २०/०२/२०२४ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार मान्यतेची शिफारस करून अंतिमत: स्विकृतीकामी मा. महापालिका सभेपुढे सादर केले होते. मा. महापालिका सभेचा कार्यकाल संपुष्ठात आलेने सदरचे अंदाजपत्रक मा. प्रशासक यांचेकडे सादर केले होते. त्यास प्रशासक महापालिका सभेने ठराव क्र. ५४८ दिनांक २०/०२/२०२४ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर अंदाजपत्रकात स्थापत्य, स्थापत्य उदयान, स्थापत्य क्रिडा, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:स्सारण, पर्यावरण व अन्य सर्व विभागांच्या भांडवली व महसूली कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. मा. महापालिका सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातील वस्तू व सेवांचे खरेदी संदर्भातील महसूली कामे व भांडवली अंदाजपत्रकातील अत्यावश्यक सेवेतील कामे तसेच विकास कामे करण्यासाठी या आर्थिक वर्षातील सदरची भांडवली, महसुली, अत्यावश्यक सेवेतील कामे व विकास कामे यांच्या नावासमोर नमूद अंदाजपत्रकीय रक्कमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता व सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम ही निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मंजूर निविदा रक्कमेइतकी राहील. तदनंतरच त्या/त्या कामांची निविदा प्रक्रीया हाती घेवून सदरची विकास कामे उपलब्ध कालावधी मध्ये करणे शक्य होईल. यासाठी प्रशासकिय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सन २०२४-२५ या अर्थिक वर्षाचे मंजूर अंदाजपत्रकात नमूद केलेप्रमाणे अ अंदाजपत्रक सर्व विभाग, क अंदाजपत्रक, पाणीपुरवठा व जलनि:स्सारण विभाग, सर्व प्रकारच्या विशेष योजना, स्थापत्य उद्यान, स्थापत्य क्रिडा, पर्यावरण अभियांत्रिकी, |

| | |
|---|---|
| | झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, झोनिपू स्थापत्य, EWS व BSUP विभाग, विद्युत विभाग, वृक्षसंवर्धन, शुध्द/अशुध्द जलउपसा केंद्र, सेक्टर २३, विद्युत, सर्व विभागाचे प अंदाजपत्रक कामे, भुयारी गटर योजना, सर्व प्रभाग, मुख्यालयासह प्रभाग स्तरावरील सर्व प्रकारची देखभाल व दुरूस्तीची कामे, UTF फंडातील विकास कामे इत्यादी सर्व विकास कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस तसेच महसुली अंदाजपत्रकातील वस्तु व सेवांच्या खरेदी संदर्भातील लेखाशिर्षासमोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम ही निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मंजूर निविदा रक्कमे इतकी राहील. वरीलप्रमाणे विषयास मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५९०** **विषय क्रमांक- ५९०**
**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५९०**<br>**दिनांक -**<br>**१२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/३३/८४/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ६१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बो-हाडेवाडी या गावाच्या मंजूर विकास योजनेमध्ये नगर रचना योजना राबविणेबाबत. |
| **ठराव क्र. ५९०**<br>**दिनांक -**<br>**१२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/३३/८४/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील वाढीव हद्दीतील मौजे बो-हाडेवाडी, ता. हवेली जि.पुणे येथे **नगर रचना योजना** तयार करण्याचे योजिले होते. सदर कामाची निविदा मा. आयुक्तसो यांनी दि.१५/०९/२०१८ चे प्रस्तावान्वये र.रू.१७५००/- प्रति हेक्टर दराने (GST वगळून) स्विकृत केलेली आहे सदरहू योजना एक वर्षात शासनास सादर करावयाची होती. परंतू दरम्यान कोव्हीड-१९ महामारीमुळे, मोजणी अप्राप्त असलेमुळे व सोबत चालू असलेल्या उर्वरीत नगर रचना योजना निळया पुररेषेमुळे स्थगित झाल्याने बो-हाडेवाडी योजना ही व्यपगत झालेली होती. त्यावर सदरहू योजना पुनःश्च पुनर्जिवीत करणेकरीता मान्यता दिली आहे. मा.आयुक्त यांनी दिलेल्या सुचनेनुसार यापुर्वीच्या निविदाधारक कंपनीने काम करणेकरीता मे.एच.सी.पी.डीझाईन प्लॅनिंग अँड मॅनेजमेंट प्रा.लि. यांनी सुधारीत दर खालीलप्रमाणे कळविलेले आहेत. |

| | Item name | Rate per Hectare | Revised Rate per |
|---|---|---|---|

| Sl | | (in 2019) | Hectare |
|---|---|---|---|
| 1 | For Greenfield Parcel Wherein open/undeveloped land is & gt. 50% of the land parcel | Rs.17,500/- | Rs.28,200/- |
| 2 | For Semi-Urban Parcel Wherein open/undeveloped land is & it. 50% but & gt. 30% of the land parcel | Rs.19,000/- | Rs.30,600/- |
| 3 | For Urban Parcel Wherein open/undeveloped land is < 30% of the land parcel | Rs.21,500/- | Rs.34,600/- |

तथापि सदरचे दर जास्तीचे असल्यामुळे संबंधित कंपनीशी तडजोड करुन दर अंतिम करणेत येईल. त्यामुळे सदर कंपनीस पुढील एक वर्षे मुदत वाढीसाठी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५९१** **विषय क्रमांक- ५९१**
**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५९१ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/६८/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, विकास योजना- पिंपरी चिंचवड मौजे चऱ्होली येथील सर्व्हे क्र. ३१७(जुना ३४७), सर्व्हे क्र. ३१८(जुना ३५२) या जमिनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करणेबाबत. |
| | |

| | |
|---|---|
| ठराव क्र. ५९१ दिनांक - १२/०३/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. नरवि/कावि/१६/६८/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, मौजे चऱ्होली येथील सर्व्हे क्र. ३१७(जुना ३४७), सर्व्हे क्र. ३१८(जुना ३५२) या जमिनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावास मा.प्रशासक यांचा महापालिका सभा ठराव क्र. - ५४३, दिनांक- ०९/०२/२०२४ अन्वये मान्यता प्रदान केलेली असून त्याअनुषंगाने दि.११/०२/२०२४ रोजी दै.सकाळ व दै.टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमानपत्रात जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात आलेले होते. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०७/०२/२०२४ मधील दि.२२/०२/२०२४ ते दि.२८/०२/२०२४ अन्वये पान क्र. ३१ ते ३२ वर प्रसिद्धीकरण देणेत आले होते.<br>प्रस्तावामधील जमिन मालकांना दि. ०७/०३/२०२४ रोजीचे पत्रान्वये आपले काही म्हणणे असलेस दि. ११/०२/२०२४ रोजी मा. आयुक्त यांचे कार्यालयात उपस्थित राहून लेखी म्हणणे सादर करणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार जमिन मालक प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांनी आपले लेखी म्हणणे सादर केलेले आहे. (सोबत प्रपत्र 'अ' जोडले आहे) प्रसिद्धीनुसार विहित मुदतीत एकही हरकत प्राप्त झालेली नाही. उपरोक्त वैधनिक कार्यवाही पूर्ण झाली असल्याने शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ चा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**दिनांक – १२ /०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| विषय क्र. ५९२ दिनांक - १२/०३/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. अक्षेका/स्था/कावि/५/४४/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, अग्निशमन केंद्र बांधणे या लेखाशिर्ष अंतर्गत अंदाजपत्रकीय रक्कमेचा अंतर्भाव करणेबाबत. |
| ठराव क्र. ५९२ दिनांक - १२/०३/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. अक्षेका/स्था/कावि/५/४४/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये रावेत स.नं. ९६ आरक्षण क्र. ४/९९ या जागेत तसेच प्रभाग क्र. १५ हेडगेवार भवन जवळ अग्निशमन केंद्र बांधणेचे नियोजन आहे. त्यानुसार कामाचे अंदाजपत्रके तयार करुन मा. अंदाजपत्रकीय समिती व तांत्रिक समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदर कामांना तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे.<br>मनपाचे सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रक पानांक १४८ अ.क्र. ०३ अग्निशमन केंद्र बांधणे या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०२३-२४ च्या सुधारीत |

अर्थसंकल्पात र.रु. २४ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात या लेखाशिर्षा अंतर्गत र.रु. २०० कोटी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर लेखाशिर्षा खाली प्रभाग क्र. १६ मध्ये रावेत भागातील स.न. ९६ आरक्षण क्र. ४/९९ येथे व प्र.क्र. १५ हेडगेवार भवन जवळ अग्निशमन केंद्र बांधणेचे कामे सदरलेखाशिर्षा अंतर्गत करणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. १०० कोटीची आवश्यकता आहे. तथापि, मा. महापालिका सभेने मंजुर केलेल्या (ठराव क्र. ३०६१ दि. २०/०२/२०२४) अग्निशमन विभागाचे अंदाजपत्रकात अंदाजपत्रकीय रक्कमेचा समावेश करणेचा राहुन गेले आहे.

उपरोक्त उल्लेख केलेली कामे करणेसाठी अग्निशामन विभागाचे अंदाजपत्रकात अग्निशमन केंद्र बांधणे या लेखाशिर्षा खाली अंदाजपत्रकीय रक्कम रु. १०० कोटीचा समावेश करणेकामी मा. महापालिका सभेची खालील प्रमाणे मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अवाश्यक अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र. / अ.क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १६ मध्ये रावेत भागातील स.न.९६ आरक्षण क्र. ४/९९ मधील जागेत अग्निशमन केंद्र बांधणे. | ३० कोटी | “अ” अंदाजपत्रक भांडवली खर्च अंतर्गत “अग्निशमन केंद्र बांधणे” | १४८/०३ |
| २ | प्रभाग क्र. १५ हेडगेवार भवन जवळ अग्निशमन केंद्र उभारणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ५० कोटी | | |

**निर्णय:** **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५९३** | **विषय क्रमांक- ५९३**
**दिनांक – १२ /०३/२०२४** | **खाते-मा.आयुक**

**विषय क्र. ५९३ दिनांक - १२/०३/२०२४**

मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. मसाभां/०८/कावि/४९/२०२४, दि.१२/०३/२०२४ अन्वये, महानगरपालिकेच्या चार सेकंडरी रूग्णालयामध्ये Cardiac OPD along with color Doppler/2D-Echo ही सेवा सुरु करणेस मान्यतेबाबत.

**ठराव क्र. ५९३ दिनांक - १२/०३/२०२४**

मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. मसाभां/०८/कावि/४९/२०२४, दि. १२/०३/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चार सेकंडरी रूग्णालयामध्ये वायसीएम रुग्णालयाच्या धर्तीवर Cardiac OPD along with color Doppler/2D-Echo सेवा सुरु करणेकामी प्रस्तावित आहे. त्यानुसार सद्यस्थितीत मे रुबी एल केअर सर्व्हीसेस प्रा.लि.यांचे मार्फत वायसीएम रुग्णालय येथे सुरु असणाऱ्या वरील सेवा त्याच दराने मे रुबी एल केअर सर्व्हीसेस प्रा.लि.यांचेमार्फत महानगरपालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालय, नवीन भोसरी रुग्णालय, नवीन जिजामाता रुग्णालय व ह.भ.प कै. प्रभाकर कुटे रुग्णालय, आकुर्डी या रुग्णालयांमध्ये सुरु करणेकामी दिनांक २१/१२/२०२३ रोजी मा.आयुक्त सो. यांचे दालनात Joint Management Service Committee च्या

| | |
|---|---|
| | झालेल्या बैठकीत घेण्यात आला. सदर बाब ही नव्याने सुरु करत असल्याने धोरणात्मक निर्णयामुळे मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५९४**
**दिनांक – १२ /०३/२०२४**

**विषय क्रमांक- ५९४**
**खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५९४ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. अग्नि/४/कावि/१२७/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, व्यवसाय अग्निसुरक्षा पुर्तता प्रमाणपत्र व त्यांचे सेवा शुल्क दर निश्चित करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५९४ दिनांक - १२/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. अग्नि/४/कावि/१२७/२०२४ दि.१२/३/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षत्रामधील पुर्णानगर चिखली, ज्योतीबा नगर, तळवडे, जय मल्हार कॉलनी, वाल्हेकरवाडी, चिंचवड येथील आग दुर्घटना व विभागास प्राप्त होणा-या अन्य आग वर्दीचे अवलोकन केले असता, मनपा क्षेत्रातील बहुतांश व्यवसायिक मिळकतींमध्ये अग्नि प्रतिबंधात्मक उपाययोजना नसल्यामुळे सदर घटना घडल्याचे दिसून येते. तसेच त्याच मिळकतींमध्ये वास्तव्य, धोकादायक प्रदार्थांचा साठा ई. केल्याचे दिसून येते. अशी दुर्घटना भविष्यात होऊ नये याकरीता महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीवसुरक्षितता अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये, पिंपरी चिंचवड शहरास अग्नि सुरक्षित करणेकामी, पिंपरी चिंचवड क्षेत्रातील सर्व व्यवसाय मिळकतींना “ व्यवसाय अग्नि सुरक्षा पुर्तता प्रमाणपत्र ” अनुज्ञेय करणेकामी परिशिष्ट “ ब ” प्रमाणे (१) संस्थेच्या इमारती (२) रासायनिक ज्वलनशिल पदार्थ व व्यापारी दुकाने(३) औद्योगिक इमारत कंपनी कारखाने (४) हॉटेल (५) घरगुती मेस, खानावळ इ. (६) लग्न कार्यालय, बॅंक्वेट हॉल इ. (७) पेट्रोल पंप (८) सिनेमागृह ई. (९) एल.पी.जी. / सि एनजी रेटिक्युलेशन यंत्रण (१०) हंगामी फटाका (११) सर्कस (१२) कच्चे बांधकाम तात्पुरता वापर (१३) अन्य व्यवसाय असे मिळतींचे प्रकार तयार करुन त्यांस अनुज्ञेय असणारे अग्निशमन सेवा शुल्क “ परिशिष्ट अ ” प्रमाणे लागू करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड शहरातील विविध व्यावसायिक मिळकतीमध्ये अग्नि प्रतिबंधात्मक उपायोजना उपलब्ध आहे किंवा नाही याची खातरजमा करणेकरीता अग्निप्रतिबंधात्मक सर्वेक्षण करणेचे कामकाज करणेत येत आहे. त्यामध्ये मनपा क्षेत्रातील व्यावसायिक, औद्योगिक, शैक्षणिक, संस्थात्मक व वैद्यकिय इमारतीचे अग्नि प्रतिबंधात्मक सर्वेक्षण झालेल्या सुमारे ४३,९४१ हजार मिळकती पैंकी २,४२३ धोकादायक मालमत्तेची ओळख पटविण्यात आली असून, त्यापैकी ९१८ मिळकतींना नोटीस देण्यात आलेली आहे व उर्वरीत मालमत्तांना नोटीस देण्याची कार्यवाही कार्यान्वीत |

| | |
|---|---|
| | आहे. अग्निशमन विभागाकडून देणेत आलेल्या नोटीसमध्ये सदर मिळकत अग्नि सुरक्षित करणेकामी अग्निशमन विभागाकडील " व्यवसाय अग्निसुरक्षा पुर्तता प्रमाणपत्र " घेणे बाबत नमुद आहे. तथापि, या पुर्वीचे आदेश क्र. अग्नि/४/कावि/६०१/२०२२ दि. २६/१०/२०२१ नूसार निश्चित करणेत आलेल्या " उद्योग धंदा व्यवसाय व अन्य सेवा अग्निशमन सेवा शुल्क " यामध्ये अनाधिकृत व्यवसाय व अन्य व्यवसायांबाबत सेवा शुल्क निश्चिती करणेत आलेले नसल्याने, परिशिष्ठ "ब" प्रमाणे मिळकतींचे वर्गीकरण करुन यापुर्वीचे दि. २६/१०/२०२१ अन्वये अनुज्ञेय करणेत आलेले उद्योग धंदा, व्यवसाय अग्निशमन सेवा शुल्का रद्द करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्नि सुरक्षित करणेकामी परिशिष्ठ "अ" प्रमाणे " व्यवसाय अग्नि सुरक्षा पुर्तता प्रमाणपत्र " अनुज्ञेय करणे व त्याकामी अनुज्ञेय करावयाचे सेवा शुल्क तक्ता विहित अटी व शर्तीसह लागू करणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही-
(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

सही-
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका